Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 6, July 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# मध्ययुगीन महाराष्ट्रातील सांस्कृतिक प्रबोधनाचे अग्रदूत, 'संत एकनाथ' यांच्या ऐतिहासिक योगदानाचे विश्लेषणात्मक मुल्यांकन

*सुनिता सरायकर*

विभाग प्रमुख, इतिहास विभाग
वसंतराव नाईक, शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर.

**प्रस्तावना :–**

वारकरी संप्रदाय–वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील अत्यंत श्रेष्ठ असा भक्तिसंप्रदाय आहे. ज्ञानदेवांनी या वारकरी संप्रदायाच्या समाजमंदिराचा पाया घातला, आणि महाराष्ट्रात भक्तीआंदोलनाला सुरवात झाली. वैचारिक अधिष्ठानावर आधारित हे आंदोलन पुढे समाजप्रबोधन कार्यात अग्रसर राहिले. या भक्तिआंदोलनात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे संत एकनाथ समाजप्रबोधन कार्याचे प्रणेते म्हणून ओळखले गेले. एकनाथंचा काळ पारतंत्र्याचा आणि दुःखदारिद्रयाचा होता. महाराष्ट्रातील देवगिरीची वैभवशाली कारकीर्द यावेळी नष्ट झालेली होती. दक्षिणेकडच्या विजयनगरच्या राज्याचा आधार महाराष्ट्राला लाभत नव्हता आणि याचवेळी यावनी सत्तेची मगरमिठी महाराष्ट्राभोवती पडली होती. पिसाट धर्मान्ध सत्तांच्या अन्याय, अत्याचार, जुलूमाखाली महाराष्ट्रातील जनता होरपळून गेली होती. अशाप्रकारे राजकीय व धार्मीक संकटामुळे महाराष्ट्राचे जीवन अस्थिर झालेले होते.

अश्या या पार्श्वभुमिवर संत एकनाथांनी सोळाच्या शतकात समाजाला डोळस करण्याचे असिधाराव्रत स्विकारले व लोकांना अंधश्रध्देतून, परंपरा व रूढीप्रियतेतून मुक्त करण्याचे धाडस दाखविले. नाथांनी कर्मकांडाचे प्राबल्य नाकारून शुध्द धर्माची शिकवण समाजाला दिली. जेणेकरून व्यक्तिविकासाच्या माध्यमातून समाजविकास साध्य होईल. नाथांचे हे ऐतिहासिक कार्य तत्कालीन काळाची गरज म्हणून घडत गेले. पुढे यातूनच महाराष्ट्रात सांस्कृतिक पुनरूत्थान घडविले. मरगळलेल्या महाराष्ट्राला नवचैतन्य प्राप्त झाले. म्हणूनच एकनाथांना युगप्रवर्तक विचारवंत मानले जाते.

संत एकनाथांचा कार्यकाळ इ.स. 1533 ते 1599. भानुदास नामक वैराग्यसंपन्न व ईश्वराच्या भजनात निमग्न असणारा विठ्ठलभक्त ज्याने आपल्या अलौकिक कर्तृत्वाने पंढरपुरची श्री विठ्ठलाची मुर्ती जी विजयनगरचा राजा कृष्णदेवरायाने आपल्या राज्यात नेली होती, ती परत पंढरपुरास आणली. अशा या भानुदासाच्या वंशात एकनाथचा जन्म झाला. भानुदासाचा मुलगा चक्रपाणी, चक्रपाणीचा मुलगा सुर्यनारायणराव, आणि सुर्यनारायणरावांचा मुलगा एकनाथ अशी ही एकनाथांची पितृपरंपरा आहे. एकनाथाच्या आईचे नाव रूक्मिणी. एकनाथांना तीव्र बुद्धिमत्तेची देणगी लाभलेली होती. देवगिरीचे जनार्दनपंत त्यांचे गुरू होते. गुरूच्या आदेशावरून तिर्थाटण केले. यावेळीच महाराष्ट्रातील समाजमनाची ओळख त्यांना झाली. गुरूंच्या आज्ञेने एकनाथांनी भागवत धर्मावर टीका लिहीली. हा भागवत धर्म सर्वांना सामावून घेणारा सर्वांची काळजी वहाणारा, उदासीनतेला, व निराशेला थारा नसणारा, उच्चनीच भावाला वाव नसणारा असा हा भागवत धर्म. भागवत धर्माच्या माध्यमातून एकनाथाने सर्वांना ईश्वरप्राप्तीचा मार्ग उपलब्ध करून दिला. त्याचबरोबर आपल्या प्रत्यक्ष नित्य व्यवहारातल्या आचरणाने त्यांनी या धर्माचा वस्तुपाठ घालून दिला. नाथांचा भागवतधर्म म्हणजे मनुष्यधर्म होय. त्या काळातील समाजाची स्थितीगती लक्षात घेता नाथांनी भावगतधर्माचा केलेला प्रसार आणि त्याला दिलेले सामाजिक संदर्भ हे सांस्कृतिकदृष्टया फार महत्वाचे कार्य ठरते. नाथांच्या कार्याचे स्वरूप दुहेरी होते. एका बाजुला त्यांना आक्रमकांविरूध्द लोकमानस तयार करावयाचे होते. दुसऱ्या बाजुला आसुरी वृत्तीच्या वासनांच्या मोहाच्या गुंतवळयातून समाजाला बाहेर काढावयाचे होते. समाजाला आत्मभान आणून द्यायचे होते. उदात्तजीवन मुल्यांची शिकवण देवून स्वधर्मविषयक अस्मिता जागृत करण्याची त्याकाळी गरज होती.

---

[1] संपा. डॉ. कुळकर्णी, मदन; श्री एकनाथ महाराजांची भारूडे संहिता व समीक्षा; प्रथम आवृत्ती 1998, पिपंळापुरे प्रकाशन, नागपूर; पृ. 1.

[2] दातार, डॉ. मुकुंद; संतकवी एकनाथ; स्नेहल प्रकाशन; प्रथम आवृत्ती जुलै 1997; पृ. 17.

[3] भावे, वि. ल., पुरवणी तुळपुळे श. गो.; महाराष्ट्र सारस्वत; खंड–1; सहावी आ. 1982; पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई; पृ. 192.

[4] कित्ता पृ. 193.

**Please cite this Article as :** *सुनिता सरायकरे* **,** *मध्ययुगीन महाराष्ट्रातील सांस्कृतिक प्रबोधनाचे अग्रदूत, 'संत एकनाथ' यांच्या ऐतिहासिक योगदानाचे विश्लेषणात्मक मुल्यांकन* **: Indian Streams Research Journal (July ; 2012)**

महाराष्ट्राच्या विस्कळीत बनलेल्या सांस्कृतिक जीवनात सुसूत्रता आणण्याची पराकाष्ठा एकनाथांनी केली. त्यांनी समतेचा व बंधुभावाचा हिरीरने पाठपुरावा केला. व्यक्ती आणि समाज यांच्या प्रगतीला आवश्यक असलेल्या नीतिमुल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. वैयक्तिक प्रतिष्ठेपेक्षा सामाजिक स्थैर्याला त्यांनी महत्व दिले. त्याची विचारसरणी पंरपरानिष्ठ परिवर्तनवादाची आहे.

नाथांनी प्रापंचिकाकरिता प्रपंचाच्या भाषेत परमार्थ शिकविला. समन्वयबुध्दीचे आदर्शसमाजसुधारक आणि महाराष्ट्रातील उदारमतवाद्यांचे जनक म्हणजे एकनाथ महाराज होय. एकनाथांनी आपल्या साहित्य निर्मितीत शृंगाररस, वीररस, करूणरस, हास्यरस या सारख्या लौकिक रसांची निर्मिती करून त्यातून समाजपरिवर्तन घडवून आणले. नाथांनी धर्माच्या माध्यमातून राष्ट्रवाद रूजविला. ज्यायोगे संबंध समाजाची धारणा केली जाते तो धर्म अशी व्याख्या नाथांनी केली. नाथांनी समाजाचे अंतरंग प्रखर बनवून समाजाला आत्मसरंक्षणाचा मार्ग दाखविला. नाथांचे सामाजिक भान सदैव जागरूक होते.

मराठी भागवत धर्माचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे नाथांचे कार्य एवढे मोठे आहे की, त्यातून त्यांनी लोकजागरणाचा उद्योग करून दबलेल्या अडलेल्या समाजाला भक्तीच्या वाटेवर नेले. जनतेला भगवद्भक्तीच्या सुत्रात गोवून जनतेचे संघटन घडवून आणले. जनी जनार्दन पहाणारे नाथ होते. साऱ्या जनतेला जर्नादन होण्याची अचूक शिकवण नाथांनी दिली. म्हणून तुकाराम महाराज नाथांविषयी म्हणतात.

***''ब्राम्हणाचा पोर खेलिया एक भला। तेणे जन खेळकर केला रे।।***
***जनार्दन बसवंत करूनिया। तेणे वैष्णवांचा मेळ मेळविला रे।।***
***एक चिघाई खेळता खेळतो। आपण चि बसवंत जाला रे।।***
***एक चि घाई खेळता जो चुकला। तो पडेल संसार डाई रे।।''***

नाथांनी चतुःश्लोकी भागवताचे निमित्त करून भक्तीचा, भागवत धर्माचा प्रचार केला कारण ती त्यावेळी काळाजी गरज होती. त्यावेळी इस्लामचे आक्रमण राजकीय, धार्मिक, सामाजिक व परमार्थिक अशा स्तरावर सूरू होते. इस्लामधर्मात भक्तिप्रधानता, समता अंतर्भुत होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मुळच्या चतुःश्लोकी भागवतात भक्तीला आधार नसतांना नाथांनी आपल्या लिखाणात भक्तीचा भरघोस पुरस्कार केला. नाथांच्या तत्वज्ञानपर स्फुट ग्रंथात चतुःश्लोकी भागवत, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्ममुख, आनंदलहरी, चिरंजीवपट, आनंदानुभव आणि अनुभवामृत या आठ ग्रंथांचा समावेष होतो. या सर्व लिखणातून नाथांची समाजाभिमुखता प्रगट झाली आहे. या सर्व ग्रंथात नाथांच्या आत्मज्ञानाच्या शोधाची एक प्रक्रिया दिसून येते. पण तरीही त्यातून त्यांनी बहूजन हिताचाच विचार केलेला दिसून येतो.

लोकजीवनातील धर्मविषयक अज्ञान दूर झाल्याशिवाय समाजस्वास्थ्य निर्माण होणार नाही याची जाणीव नाथांना होती. त्याकाळात सर्वसामान्य जनतेपर्यंत वेदांचे ज्ञान पोहचत नव्हते. योगविद्या सर्वसामान्यांच्या आवाक्यात नव्हती. गहनगुढग्रंथज्ञान सामान्यांपासून खूपच दूर होते. तीर्थयात्रा करण्याचा मार्गही सामान्यांना दुर्लभ होता. या पार्श्वभुमिवर नाथांनी गुरूभक्तीच्या माध्यमातून सामान्यांना ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग उपलटध करून दिला. नाथांचे मन लोककल्याणार्थ सतत जागृत होते. तत्कालीन सांस्कृतिक स्थित्यंतरे त्यांच्या संवेदनशीलमनाने टिपली होती. नाथांनी तीर्थयात्रा करून सामाजिक व राजकीय दुरावस्था जवळून अनुभवली होती. वेदाने स्त्रियां आणि शुद्र यांना दूर ठेवले होते पण उदामतवादी नाथांनी त्यांना भगवद्रप्राप्तीचा मार्ग मोकळा करून दिला. नाथ शुध्दाशुध्दतेचा विचार व्यक्तीच्या अंतरंगावरून करतात. ज्यांचे अंतरंग शुध्द तो शुध्द. जो दुर्गुणी तो अत्यंज. आपल्या भागवतात अत्यंज प्रकृति लक्षण स्पष्ट करतांना ते म्हणतात, अशौचता, असत्यता, परद्रव्यभिलाष, नास्तिकता, कलहप्रियता, कामुकता, क्रोधशरणता आणि लोभीपणा हे आठ दुर्गुण ज्यांच्या ठायी आहेत तो अत्यंज होय. पुरोगामी प्रवृत्तीच्या नाथांनी जातीवर्णातील श्रेष्ठकनिष्ठतेचा भाव पुर्णतः झिडकारला. नाथांच्या पुरोगामी विचारांचे प्रतिबिंब त्यांनी वर्णिलेल्या चोखामेळा चरित्रात उमटले आहे. कथेत वर्णिल्याप्रमाणे, 'एकदा स्वर्गातील अमृत नासले, इंद्र काळजीत पडले त्यांनी नारदांना उपाय विचारला तेव्हा नारदाने इंद्रास पंढरपुरी जाण्यास सांगितले. इंद्र पंढरपुरीस येवून श्रीविठ्ठलास अमृत शुध्दीची विनंती करतात तेव्हा श्रीविठ्ठल हे कार्य चोखामेळा यास करण्यास सांगतात. तेव्हा चोखामेळा म्हणाले, 'देवा तुझ्या नामामृतापुढे या स्वर्गस्थ अमृताची काय गोडी'. पण विठ्ठलाने सांगितले म्हणून भक्तश्रेष्ठ चोख्याने स्वर्गस्थ अमृत शुध्द केले. अशा रीतीने अस्पृश्य मानल्या गेलेल्या चोखामेळयाला दिलेला हा अधिकार म्हणजे भक्तीची जातीपातीच्या धोरणावर केलेली मात होय.

नाथांच्या पुरोगामी विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या भावार्थ रामायणातही दिसते. यात त्यांनी सती जाण्याच्या प्रथेला स्पष्ट विरोध दर्शविला आहे. किष्किंधा कांडात मरणोन्मुख वाली आपल्या पत्नीस तारेस उपदेश करतो, ''मजसवे नको होऊ सती। जीवित्व अर्पावे रघुपती। तोचि सतीत्व सत्य त्रिजगती। प्रेमाप्रति नको मरू'' ।। यात 'प्रेमाप्रति नको मरू' या शब्दातून वास्तवाचे भान ठेवण्याचा सल्ला दिलेला दिसतो. सर्वांभूती समभाव नाथांनी बाळगला होता. मानवी विकासाच्या इतिहासात परमार्थ प्रेरित सौजन्य, ईश्वरनिष्ठ मानवतावाद, निरपेक्ष प्रेम, सौहार्द संबंध प्रस्थापित होणे त्यावेळी महत्वाचे होते. हे कार्य नाथांनी केले. नाथांनी श्राध्दाच्या दिवशी ब्राम्हणांच्या आधी मुसलमानास जेवू घातले. हरिभक्त अनामिकाकडे जेवण घेतल, चोरी करुन तुरूंगात डांबल्या गेलेल्या व कित्येक दिवस अन्न न मिळाल्यामुळे प्रेतव्रत झालेल्या अनामिकाला नाथांनी आश्रय दिला. तिसऱ्या प्रसंगी महाराच्या पोरास कुरवाळीत आईकडे पोचवितो आणि चवथेप्रसंगी महाराचे घरी जावून त्याच्या बायकोने शिजविलेले अन्न जेवतो. प्रत्येक वेळी नाथांचे पाऊल पुढेच पडत जाते. नाथांच्या जीवन चरित्रातले हे प्रसंग नाथांचे सामाजिक पुरोगामित्व प्रगट करतात. हे पुरोगामित्व त्यांच्या पारमार्थिक भूमिकेतून स्फुरण पावलेले आहे. परमार्थ हा स्वभावतःच क्रान्तीकारक आहे. नाथांचे पुरोगामित्व कृतीशील होते हे दिसून येते. नाथांच्या सामाजिक वर्तनात क्रान्तीचे तेज होते. पण नाथांची क्रान्ती शांती सहनशीलता, क्षमाशीलता, आणि पारमार्थिक निर्भयता या गुणांनी परिपुर्ण होती. नाथांनी तत्वविचारांना आचरणाची जोड दिली. एका प्रसंगात नाथ गोदावरीत स्नान करून परतत असतांना अनेकदा अंगावर थुंकणाऱ्या समाजकंटकाचे कुवर्तन नाथांनी शांतवृत्तीने सहन केले. गणिकेचा पारमार्थिक उध्दार केला. तहानलेल्या गाढवाला पाणी पाजले. नाथांच्या या सर्व कृती त्यांच्या समदृष्टीचे प्रतिक होत. नाथ निंदकाला गुरूस्थानी मानत असत. क्रोधावर विजय मिळविण्याचे हे तत्वज्ञानच त्यांनी सांगितले.

---

[5] श्री एकनाथ म. भाखडे, संहिता व समीक्षा; पृ. 1.
[6] महाराष्ट्र सारस्वत, खंड 1, पृ. 197.
[7] संतकवी एकनाथ, पृष्ठ 271.
[8] कित्ता पृ. 272.
[9] तुळपुळे, श. गो.; लोकसाहित्यकार नाथ; लेख. श्री. एकनाथ दर्शन भा.द., पृ. 392.
[10] संतकवी एकनाथ, डॉ. दातार, पृ. 265.
[11] कित्ता, पृ. 265.
[12] तुकारामाची अभंगगाथा (शासकीयप्रत) अभंग क्र. 190.
[13]देशपांडे, अ. ना.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास; प्रथम आवृत्ती 1977, व्हीनस प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, पृ. 77.

***निंदक कामाचा कामाचा। गडी आत्मारामाचा।।***
***निंदक अमुची काशी। आमुची पातके अवधि नाशी।।***
***निंदक आमुची गंगा। आमुची पातके नेते भंगा।।***
***निंदक आमुचा सखा। अमुची वस्त्रे धुतो फुका।।***
***निंदक अमुचा गुरू। एका जनार्दनी थोरू।।***

'निंदा म्हणजे परमामृत' असे नाथ समजत असत. नाथांच्या वर्तनातील ही सामाजिक क्रान्तीची बीजे होत असे म्हणता येईल.

नाथांनी चरित्रकथा व रूपकांच्या माध्यमातून जनसामान्यांना संत महंतांचा परिचय करून दिला व भक्तीचे महत्व प्रतिपादन केले. लोकमानसाला परिचित असणाऱ्या अशाच चरित्रविषयांची निवड केली. नाथांच्या मधुराभक्तिपर लेखनातून गौळणी व विराण्या निर्माण झाल्यात. नाथांनी गोपींच्या रूपाने भक्तिमार्गातील साधकांच्या अवस्थांचे प्रभावी चित्रण केले आहे. प्रीती आणि भक्ती यांच्या समन्वयातून परमार्थ साधण्याचे सामर्थ्य नाथांच्या विराण्यातून सामान्यांना प्राप्त झाले.

सुलभ भक्तिमार्गाचे महत्व जनमानसावर ठसविण्यासाठी नाथांनी माहात्म्यपर लेखन केले. उदा. दशावतार महात्म्य, ग्रंथमहात्म्य, पुजामहात्म्य, स्थलमहात्म्य अशी विषयांची विविधता आढळते. नाथांच्या या माहात्म्यपर रचनेची बीजे तत्कालीन धार्मिक, सामाजिक परिस्थितीत आढळतात. समाजातील अनिष्ट रूढी–परंपरांचे, वैदिक कर्मकांडाच्या स्तोमाचे आणि भेदभावाचे निर्मूलन करण्याचा हेतू या निर्मितीमागे आहे. यज्ञयागादि अवघड कर्मकांड करीत बसण्यापेक्ष एका तुलसीपुजनानेही परमेश्वराला प्रसन्न करून घेता येते असा संदेश नाथांनी आपल्या तुलसी–माहात्म्य या रचनेतून समाजाला दिला आहे.

तत्कालीन अवनत बहूजन समाजाला सुलभ ज्ञानोत्तर भक्तीचे बाळकडू पाजण्यासाठी कथाकाव्यासारखे प्रभावी माध्यम निवडून नाथांनी लोकमानसाला भावतील अशाच कथाविषयाची निवड केली. अंधश्रध्देने व्रतवैकल्ये आचरणाऱ्या जनतेच्या श्रध्दाळू लोकमानसाला डोळस भक्तीची जोड देण्यासाठी आणि त्यांच्यावर उदत्त नितीमुल्यांचे संस्कार करण्यासाठी त्यांनी कथाकाव्यासारखे प्रभावी माध्यम वापरले. उदा. सत्यभामा व्रतकथा, संदीपनकथा, उपमन्यूकथा, इ. याचप्रमाणे नाथांनी आरती सारखे माध्यम हाताळून जनसामान्यांना त्यांच्या मनातील भक्ती प्रगट करण्याचे एक साधन उपलब्ध करून दिले. काकडआरती, पंचारती, शेजारती, या सारखे आरतीचे विविध प्रकार नाथांनी निर्मिलेत.

नाथांनी समाजाच्या कानाकोपऱ्यातील सर्व घटकांना सामावून घेतांना, एका व्यासपीठावर त्यांना आणतांना भारूड हा साहित्यप्रकार निर्माण केला. विविध लोककला लोकनृत्ये व लोकसंगीत यांच्या आधारावरच हे नाटय फुलविले. या भारूड प्रकारातून नाथांनी घडविलेले प्रभावी समाजदर्शन समाजसंघटन आणि लोकरंजनाद्वारे साधलेले समाजप्रबोधन अस्सल लोकभाषेचा प्रबोधन माध्यम म्हणून केलेला स्वीकार लोककलांचा अत्यंत कौशल्याने केलेला उपयोग यातूनच नाथांचे लोकप्रबोधनाचे कार्य यशस्वी पार पडले. भारूडे नाथांची लोकशिक्षकाची भुमिका दर्शविणारी आहे. भारूड मुळात लोककला होती. नाथांनी तीचे बाहय स्वरूप स्विकारले पण अंतरंगात स्वतःचे अध्यात्म तत्वज्ञान पेरले. सामान्य जनतेच्या धार्मिक पारमार्थिक व नैतिक सुधारणा करण्याच्या हेतूने नाट्याचा अवलंब करून ही भारूडे किंवा उपदेशपर रूपके नाथांनी लिहिली. लोकांशी संवाद साधण्याचे साधन म्हणून त्यांनी भारूडाकडे पाहिले. नाथांनी लोकसंस्कृतीला चांगलेच समजून घेतले होते. समाजाचे आचारविचार, रूढी प्रथा, लोकांची मनोवृत्ती जीवनरीती यांचे त्यांना चांगले ज्ञान होते. नाथांच्या भारूडा मागील प्रेरणाचे मूळ त्यांच्या चिंतनशील अध्यात्मप्रवण आणि संवेदनाक्षम मनात आढळते.

नाथकालीन समाज अंधश्रध्देच्या विळख्यात सापडलेला होता. कर्मकांडाचे प्राबल्य वाढले होते. समाजातील विषमता, दुःख, दैन्य, जातीभेद नष्ट व्हावे असे नाथांना वाटत होते. म्हणूनच समाजाविषयीची जबाबदारी आणि करूणा यामुळे त्यांना भारूडे लिहिण्याची प्रेरणा मिळाली. संत एकनाथ हे लोकशिक्षण होते. त्यासाठी त्यांनी लोकसंस्कृतीचा डोळस अभ्यास केलेला होता. समाजोध्दाराची त्यांना तळमळ होती. समाजाचे सुक्ष्म निरीक्षण केल्यामुळेच विविध विषयांवरची भारूडे त्यांनी लिहिली. अज्ञानाचा काळोख दूर व्हावा व लोकोध्दार व्हावा हीच नाथांची आंतरिक इच्छा होती. नाथांचे मन लोकल्याणार्थ सतत जागृत होते. तत्कालीन सांस्कृतिक स्थित्यंतरे त्यांच्या संवेदनशील मनाने टिपली होती. तात्विक पातळीवर लेखन करतांना नाथ जे समाजदर्शन घडवितात. त्यावरून हे लेखन समाजप्रबोधनासाठी आहे हे लक्षात येते. अंधश्रध्देने कर्मकांडाच्या आहारी जाणाऱ्या जनतेच्या श्रध्दाळू लोकमानसाला डोळस भक्तीची जोड देण्यासाठी आणि त्यांच्यावर उदत्त नितीमुल्यांचे संस्कार करण्यासाठीच नाथांनी हेतूपुरस्सर प्रयत्न केलेत.

नाथ समाजसुधारक होते. समाजातील विषमतेची त्यांना जाणीव होती. म्हणूनच नाथांच्या रूपक योजनेत सामाजिक जीवनातील उदाहरणे आहेत. भारूडात सादरीकरणाला महत्व होते. लोकसंस्कृतीतील अनेक घटक भारूडाचा विषय झाले आहेत. भारूडाचे बाहयांग हे लोकांना परिचित विषयाचे आहे, पण अंतरंग अध्यात्माचे आहे. एकनाथांच्या अभंग गाथेतील पाचवा भाग अशा भारूडांचा म्हणजे उपदेशपर रूपकांचा आहे. या भारूडात नाथांनी, जोशी, बाळसंतोष, वासुदेव, आंधळा, पांगुळ, बहिरा, पिसा, मुका, सरोदा, कोल्हारी, डोंबारी, वैदू, माळी, जंगम, वाघ्या, भुत्या, पिंगळा, सन्यासी, यांना बोलके केले आहे. एकनाथांच्या अजब सृष्टीत पशू पक्षीही बोलके होतात. पाखरू, वटवाघूळ, पोपट, सर्प, विंचू, बैल, एडका, श्वान यांचाही समावेष नाथांच्या भारूडात आहे. भारूडांचा प्रसार समाजाच्या सर्व स्तरांपर्यत झाला. हे कार्य गोंधळी, भराडी, वासुदेव, भुत्ये यासारख्या लोकसंस्कृतीच्या उपासकांकडून झाला. जे लोक समाजासमोर वावरून भिक्षेने पोट भरणारे होते. भिक्षा मागतांना जे बोलावे लागे त्यात नाथांनी आपले विचार घालून ते विचार भिक्षेकऱ्याच्या माध्यमातून खेडोपाडी जनतेच्या कानावर पोचविण्यासाठी भारूडाचे माध्यम निवडले कारण भारूड या काव्यप्रकारात नाटय व जनतेशी संवाद साधण्याचे सामर्थ्य आहे.

---

[14] गोसावी, डॉ. कुमुद, संत एकनाथांचे स्फुट लेखन, प्रथम आवृत्ती ऑगस्ट 1981, प्रकाशक, आचार्य गोविंद श्रीनिवास गोसावी औरंगाबाद; पृ. 407.

[15] प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग 4, पृ. 77.[16] संतकवी एकनाथ; पृ. 116.

[16] जोशी, का. अ., एकनाथांची अभंगगाथा; श्री सकलग्रंथगाथा खंड 2; प्रकाशक श्री संतवाङ्मय प्रकाशन मंदिर पुणे 1967; अभंग क्रमांक 3677 ते 3682.

[17] संपा. घारपुरे, ज. र., भावार्थ रामायण किष्किंधाकांड; अ. 7, ओवी क्र. 40–43.

[18] प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग 4; पृ. 60.

[19] कित्ता पृ. 61.

[20] प्राचीन म–वा. 3; भाग 4, पृ. 69–70.

[21] कित्ता, पृ. 70

[22] संत एकनाथांचे स्फुट लेखन; पृ. 410.

[23] संत एकनाथांचे स्फुट लेखन; पृ. 411.

या विविध विषयांवरील भारूडांच्या निमित्ताने नाथांनी महाराष्ट्राच्या गोंधळलेल्या जनमानसात डोळस श्रध्दा निर्माण करून लोकमानस ईश्वर भक्तीकडे केंद्रित केला व खोटया साधू, भोंदूंचा निषेध करून यज्ञयाग, कर्मकांडांना नाकारून सरळ सोपा मार्ग समाजाला दाखविला जो सदाचारावर व सात्विकतेवर आधारित होता. नाथकाळात दिशाहीन आणि बलहीन बनलेल्या समाजाला जागृत करणाऱ्या नेतृत्वाची अत्यंत गरज होती. त्यासाठी स्वधर्माची व स्वपराक्रमाची लोपलेली प्रतिष्ठा प्राप्त करून देणे अत्यंत अवघड कार्य होते. नाथकाळातील परिस्थितीचा गुंता अधिक वाढला होता. त्यामुळे अशा संभ्रमित परिस्थितीचे आव्हान नाथांनी स्विकारले, वाट शोधली व पुर्णत्वाला नेले. आपली निर्मिती ही सर्वसामान्यांच्या हृदयाला जावून भिडावी असाच त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी आपल्या रचनेचे वळण असेच घेतले की जे लोकमानसाला भावेल, रूचेल पचेल व पेलवेल. त्यामुळेच नाथ लोकांपर्यंत पोचले व लोकप्रिय बनले.

स्वधर्मीयांबरोबर नाथांनी परधर्मीयांना व परपंथीयांनाही आपल्या लोकसंघटनेत सामावून घेतले. त्यांच्याशीही सुसवांद साधला. नाथांनी त्यांच्या चालीरीती त्यांची भाषा, त्यांची संस्कृती यांचे सुक्ष्म अवलोकन व आकलन केले आणि परस्परांशी प्रेमाने वागणे हाच खरा मानवता धर्म आहे याची जाण आपल्या लेखणीतून करून दिली. एकनाथांच्या 'हिंदू–तुर्क संवाद' या अभंगबद्ध प्रकरणात, प्रथम हिंदू व मुसलमान एकमेकांच्या धर्मावर मनसोक्त तोंडसुख घेतात, पण पुढे त्यांना सत्य पटते आणि दोघांची दिलजमाई होते. हिंदू आणि तुर्क यांच्यातील विवेक जेव्हा जागृत होतो तेव्हा दोन्ही समाजाचा निर्माणकर्ता एकच आहे. तो कोणत्याही जाती धर्मात बंदिस्त नाही. त्यामुळे तो भेदातील आहे हे प्रखर सत्य त्यांना जाणवते.

अशा रीतीने संत एकनाथ श्रेष्ठ लोकशिक्षक होते. समाजसुधारक होते. जनसामान्यांच्या व्यावहारिक अनुभवविश्वाचे रूपांतर त्यांनी आध्यात्मिक अनुभवविश्वात करून लोकभाषा व लोककलेच्या माध्यमातून सांस्कृतिक पुरूत्थान घडवून आणले. नाथांनी लोकरंजन करतांनाच धर्मजागरण केले. महाराष्ट्रीय समाज जीवनाला संत एकनाथांनी नवीन जीवनदृष्टी दिली. पारतंत्र्याच्या ऐन मध्यकाली नाथांनी रामराज्याची गुढी उभारा, असा संदेश देवून शिवकाळाची पहाट घडविली. नाथांनी समाजाचे अंतरंग प्रखर बनविले व समाजाला आत्मसंरक्षणासाठी कटिबध्द केले. नाथांनी तत्कालीन साऱ्या सत्शक्तींना आवाहन करीत शांत चित्ताने आणि विवेकाने समाज प्रबोधकाची भुमिका सांभाळली. नाथांनी समाजातील सर्व उपेक्षितांचे अंतरंग जाणून आपल्या साहित्य संजीवनीने त्यांच्यातील आत्मप्रतिष्ठेला जागृत केले. अशा रीतीने नाथांनी लोकमानसाला अधिक विश्वासात घेवून लोकसंग्रहाचे कार्य केले.

संदर्भग्रंथ –

1) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : अ. ना. देशपांडे, भाग 3 व 4; व्हीनस प्रकाशन पुणे; प्रथम आवृत्ती 1977.
2) संतकवी एकनाथ; स्नेहल प्रकाशन पुणे, डॉ. मुकुंद दातार प्रथम आवृत्ती जुलै 1997.
3) संत एकनाथांचे स्फुट लेखन : डॉ.सौ. कुमुद गोसावी, श्रीनिवास गोसावी प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 1981.
4) श्री एकनाथ महाराजांची भारूडे, संपा. डॉ. मदन कुळकर्णी संहिता व समीक्षा, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर, प्रथम आवृत्ती नोव्हें. 1998.
5) पाच संतकवी : श. गो. तुळपुळे, पुणे 1962.
6) संशोधनधारा : पा. ना. कुलकर्णी, व्हीनस प्रकाशन, पुणे 1997.
7) महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1963.
8) महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास : ह. श्री. शेणोलीकर, मोघे प्रकाशन कोल्हापूर / पुणे 1972.
9) एकनाथ दर्शन : सरदार, ग. बा., मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे 1978.
10) एकनाथ वाङ्मय आणि कार्य : फाटक नं. 2, मौज प्रकाशन, मुंबई 1963.

[24] कित्ता पृ. 413.
[25] संत एकनाथांचे स्फूट लेखन; पृ. 412.
[26] श्री एकनाथ महाराजांची भारूडे, संहिता व समीक्षा, पृ. 3.
[27] कित्ता, पृ. 4.
[28] व्यवहारे, डॉ. शरद, एकनाथांची भारूडे, पृ. 9.
[29] संत एकनाथांचे स्फूट लेखन, पृ. 385.
[30] डॉ. दातार, संतकवी एकनाथ, पृ. 239.
[31] देशपांडे, अ. ना.; प्राचीन मराठी वा. इतिहास; भाग 4, पृ. 184.